मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» रविवार, दि. 1 जून 2025 | पान- 1

# महापालिकेच्या सेवेतून 88 अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त

## सेवानिवृत्तांच्या सन्मानाची परंपरा महापालिकेत सुरु करणारे चंद्रकांत इंदलकर हेच झाले निवृत्त

**पिंपरी | प्रतिनिधी**



पिंपरी चिंचवड महापालिका सेवेतून निवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, निरोगी आणि आनंदी जीवन जगावे तसेच आपल्या कुटुंबीयांना वेळ द्यावा. याशिवाय नोकरीदरम्यान राहून गेलेले पर्यटनासारखे आवडते छंद जोपासावेत असे मत अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी व्यक्त केले आणि सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पुढील आनंदी व आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छाही दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे माहे मे २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या ८२ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या ६ अशा एकूण ८८ कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे आणि तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते येथे सत्कार करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे बोलत होते.

या कार्यक्रमास शहर अभियंता मकरंद निकम, उप आयुक्त मनोज लोणकर, संदीप खोत, राजेश आगळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, लेखाधिकारी चारूशिला जोशी, कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे तसेच अभिमान भोसले, मनोज माचरे आणि महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माहे मे २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सह शहर अभियंता संजय खाबडे, विजयकुमार काळे, सहाय्यक आयुक्त श्रीकांत कोळप, कार्यकारी अभियंता दिलीप धुमाळ, प्रशासन अधिकारी संजीव भांगले, मुख्याध्यापक राजाराम भागवत, ज्योती चिपाडे, शाहिदा सय्यद, सुरेखा भालचीम, सारिका कानडे, सुनिता घुले, अरुणा महानवर, क्रीडा पर्यवेक्षक अनिता केदारी, सुरक्षा निरीक्षक बापू लिम्हण, प्रमुख अग्निशमन विमोचक संजेश ठाकूर, आरोग्य निरीक्षक बाबासाहेब राठोड, मल्हारी काळे, कार्यलय अधीक्षक वंदना ठाकरे, रवींद्र भाट, सिस्टर इन्चार्ज सुवर्णा ताठे, वंदना बांगर, ललिता पोखरकर, शारदा पुंडे, लेखापाल उषा थोरात, मुख्य लिपिक गंगाधर थोरात, कनिष्ठ अभियंता अग्रू घेरडे, सहाय्यक शिक्षक मानसिंग जायपत्रे, उपशिक्षक सविता चव्हाण, सविता गायकवाड, भारती पवार, दिलीप थोरात, मंगल लांडे, अहिल्याबाई पाटील, गटनिर्देशक प्रकाश घोडके, अग्निशमन विमोचक अशोक पिंपरे, असिस्टंट मेट्रेन पंचशिला कांबळे, लॅब टेक्निशियन कैलास खांडगे, ऑपरेशन थिंएटर असिस्टंट अजय घोणे, वायरमन हिराचंद जगताप, बाबासाहेब साळवे, वाहन चालक देविदास अस्वरे, शंकर खुडे, बालाजी अय्यंगार, सुनील जगताप, प्रदीप हिले, वॉर्ड बॉय जवाहरलाल सुंदेचा, रखवालदार रवींद्र वाळूंजकर, देवजी भांगे, कैलास येलवंडे, पोपट गावडे, मुकादम आनंदा भगत, सुनिल गायकवाड, आशा जाधव, अविनाश वाघेरे, नाईक सुभाष भुजबळ, मजूर गुलाब गुजर, अशोक लांडे, बाबासाहेब तिकोणे, गोपाल काळभोर, अनिल इंगळे, तानाजी चौधरी, शिवशंकर शट्टर, पंडित देवकर, शंकर शिर्के, काळूराम कुदळे, रमेश मोरे, प्रीतम धनानी, बाळू फुगे, प्रभाकर पाडाळे, लक्ष्मण शिंदे, विश्वनाथ लांडगे, सफाई कामगार मंगल पोळपघट, लता धेंडे, अब्दुल रज्जाक कोरबू, नंदा खुडे, पांडुरंग मेमाणे, तुळजाबाई तायडे, बाळू दिंबर, शशिकला जंजाळे, गटरकुली दिलीप पाचारणे यांचा समावेश आहे.

# चोरीला गेलेले, हरवलेले 40 लाखांचे मोबाईल मुळ मालकांना परत

## हरवलेले आणि चोरी झालेले 137 मोबाईल मुळ मालकांना परत; वाकड पोलिसांची कामगिरी

**पिंपरी | प्रतिनिधी**




नागरिकांचे हरवलेले आणि चोरी गेलेले मोबाईल शोधून परत देण्याच्या विशेष मोहिमेमध्ये वाकड पोलिसांनी मोठी कामगिरी केली. तब्बल ४० लाख रुपये किमतीचे १३७ वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल फोन महाराष्ट्रासह विविध राज्यांमधून हस्तगत करून मूळ मालकांना परत देण्यात आले आहेत. आपले मोबाइल फोन परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांच्या कामगिरीबाबत समाधान व्यक्त केले आहे.

पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, गहाळ झालेले अथवा चोरीला गेलेले मोबाईल फोन शोधण्याच्या या मोहिमेसाठी वाकड पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार शहाजी धायगुडे व प्रिया पवार यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने सीईआयआर पोर्टलच्या मदतीने मोबाईल ट्रेसिंग सुरू केली. त्यानुसार गहाळ मोबाईलचे लोकेशन पिंपरी चिंचवड, पुणे परिसर, तसेच बिहार, कर्नाटक, राजस्थान, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश अशा विविध ठिकाणी सापडले. मोबाईल ज्या व्यक्तीकडे सापडले, त्यांच्याशी थेट संपर्क साधून मोबाईल परत करण्याबाबत विनंती करण्यात आली. अनेकांनी मोबाइल स्वतः येऊन दिले, तर काहींनी कुरिअरद्वारे पाठवले. काही जण परत करण्यास टाळाटाळ करत असल्यास, पोलिसांनी कायद्याचा धाक दाखवून प्रत्यक्ष जाऊन मोबाईल हस्तगत केले. याआधी डिसेंबर २०२४ मध्येही वाकड पोलिसांनी २० लाख रुपयांचे २५७ मोबाईल नागरिकांना परत केले होते.

सदरची कामगिरी वाकड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर, पोलीस निरीक्षक गायकवाड, सहायक पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण, पोलीस अंमलदार शहाजी धायगुडे व प्रिया पवार यांनी केली आहे.

# पुणे मेट्रोच्या विस्ताराला गती मिळणार

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांची भेट

**पुणे | प्रतिनिधी**

वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मेट्रोच्या विस्तारित टप्प्यांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी देणे तसेच खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासलाबरोबरच नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या टप्प्यांना पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्डाची (पीआयबी) मान्यता मिळविण्यासंदर्भात केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची दिल्ली येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.



पुणे मेट्रोचे दोन्ही मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू असताना वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण प्रस्तावित आहे. यासाठी महामेट्रोने सविस्तर विकास आराखडा तयार केला असून, याला राज्य सरकारचीदेखील मंजुरी मिळालेली आहे. तसेच पब्लिक इन्व्हेसमेंट बोर्डाचीही मान्यता ११ मार्च २०२५ रोजी मिळाली असून, आता केंद्रीय मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे. हा प्रस्ताव लवकरात लवकर केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावा, अशी मागणी मोहोळ यांनी खट्टर यांच्याकडे केली.

तसेच, मेट्रोच्या विस्तारीकरणाचा भाग म्हणून खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला हा मार्गही दृष्टीक्षेपात असून, नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग हा जोडमार्गही प्रस्तावित आहे. याही प्रकल्पाला राज्य सरकारची मंजुरी मिळाली असून, पीआयबीची मान्यता प्रतीक्षेत आहे. तसेच पीआयबीच्या मान्यतेनंतर हा प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळात ठेवण्यात यावा, याबाबत मोहोळ यांनी खट्टर यांच्याशी चर्चा केली.



> “ शहरातील मेट्रो प्रकल्पांना गती देण्याची मोदी सरकारची भूमिका असून, नवे प्रस्तावित मार्ग लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे. संपूर्ण शहरभर मेट्रोचे जाळे तयार करताना त्याला आणखी वेग यावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दोन्ही विषयांबाबत खट्टर यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असून, याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल हा विश्वास वाटतो.
>
> **- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री, नागरी हवाई वाहतूक.**

# मालमत्ताकरापोटी दिलेले 10 कोटींचे धनादेश ‘बाउन्स’

## कराचा भरणा करण्यासाठी दिलेले दहा कोटी 15 लाख रुपयांचे 780 धनादेश वटले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील थकबाकीदार मालमत्ताधारकांनी कराचा भरणा करण्यासाठी दिलेले दहा कोटी १५ लाख रुपयांचे ७८० धनादेश वटले (बाउन्स) नाहीत. या मालमत्ताधारकांना महापालिकेने नोटीस बजाविली आहे. महिन्याभरात कराचा भरणा करावा. अन्यथा दिवाणी दावा दाखल करण्यात येईल, असा इशारा नोटिशीतून देण्यात आला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख ३३ हजार ६६४ निवासी, औद्योगिक, मिश्र, मोकळ्या जमीन, औद्योगिक अशा मालमत्ता आहेत. यांपैकी २०२४-२५ या आर्थिक वर्षात पाच लाख ४७ हजार ६२९ हजार तर नव्याने नोंदणी झालेल्या ६० हजार ७२ मालमत्ताधारकांनी ९६६ कोटी रुपयांचा कर भरणा केला. तर, पाच हजारांपेक्षा अधिक रुपयांची थकबाकी असलेले एक लाख तीन हजार ६७ मालमत्ताधारक आहेत. त्यांच्याकडे ४५८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. शिवाय, दहा कोटी १५ लाखांचे धनादेश वटले नाहीत. महापालिकेने नागरिकांना कराचा भरणा करता यावा यासाठी १६ विभागीय कार्यालये सुरू केली आहेत. अनेक मालमत्ताधारक ऑनलाइन तर काही जण धनादेशाद्वारे कराचा भरणा करतात. परंतु, काहींचे धनादेश खात्यात पैसे नसणे यासह अन्य कारणांनी वटले नाहीत. परिणामी, महापालिकेला धनादेश न वटण्याचा भुर्दंड बसतो. कागदोपत्री कामही वाढते. कर वसुलीला विलंबही झाला. २०२४-२५ या आर्थिक वर्षात कर भरण्यासाठी नागरिकांनी दिलेले दहा कोटी १५ लाखांचे ७८० धनादेश वटले नाहीत. आता या मालमत्ताधारकांकडून धनादेश स्वीकारला जाणार नसून, त्यांना ऑनलाइन किंवा रोखीच्या स्वरुपातच कराचा भरणा करावा लागणार आहे.

### थेरगाव विभागातील सर्वाधिक 235 धनादेश

» थेरगाव विभागातील सर्वाधिक २३५ धनादेश वटले नाहीत. त्याखालोखाल भोसरी ९७, चिंचवड ८५, चिखली ६८, तळवडे २९, सांगवी २८, पिंपरीनगर, दिघी बोपखेल प्रत्येकी २६, निगडी, प्राधिकरण २५, मनपा भवन २३, कस्पटेवस्ती २२, चऱ्होली, मोशी प्रत्येकी १८, किवळे, फुगेवाडी-दापोडी प्रत्येकी १७, वाकड, पिंपरीवाघेरे प्रत्येकी १६ आणि आकुर्डी विभागातील १४ धनादेश आहेत.

> “ दहा कोटी १५ लाख रुपयांचे ७८० धनादेश वटले नाहीत. संबंधित मालमत्ताधारकांना नोटीस देण्यात आली आहे. महिन्याभरात कराचा भरणा न केल्यास खटले दाखल करण्यात येणार आहेत. त्यांची मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल. त्यांच्याकडून आता धनादेश स्वीकारला जाणार नाही.
>
> **- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, कर संकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# 'एमआयडीसी'साठी अग्निशमन केंद्र, महापालिकेकडून 22 कोटींची निविदा

## पिंपरी, चिंचवड आणि भोसरीतील औद्योगिक विकास महामंडळासाठी महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड आणि भोसरीतील औद्योगिक विकास महामंडळासाठी (एमआयडीसी) पिंपरी-चिंचवड महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार आहे. हे केंद्र एमआयडीसीने दिलेल्या टाटा मोटर्सच्या मालवाहतूक प्रवेशद्वारासमोरील मोकळ्या भूखंडावर (प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक) येथे उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने २२ कोटी ८४ लाख ७५ हजार रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे.

सद्य:स्थितीत पिंपरी-चिंचवड एमआयडीसीत बहुउद्देशीय कंपन्यांना सुटे भाग पुरविणारे सुमारे १६ हजार सूक्ष्म, लघुउद्योग सुरू आहेत. या १६ हजार उद्योगांमध्ये सात लाख कामगारांच्या हाताला रोजगार मिळाला आहे. लघु उद्योग वाहनांचे सुटे भाग (ऑटोमोबाइल्स पार्टस) संरक्षण विभागाला लागणारे सुटे भाग, प्रेस पार्ट, रबर, प्लास्टिक, इंजिनीअरिंग कंपन्यांसाठीचे फॅब्रिकेशन उत्पादन करतात. शहरातील मोठ्या उद्योगांसह विदेशातील उद्योगांना हे सुटे भाग पुरविले जातात.

एमआयडीसीतील एखाद्या कंपनीला आग लागल्यास संत तुकारामनगर येथील अग्निशमन केंद्रावर अवलंबून रहावे लागत होते. हे अंतर लांब असल्याने बंब येण्यास विलंब होत असल्याने उद्योजकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. उद्योगांसाठी एमआयडीसी परिसरात स्वतंत्र अग्निशमन केंद्र असावे, यासाठी एमआयडीसीने भोसरी येथील प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक येथे भूखंड राखीव ठेवला होता. या भूखंडावर अग्निशमन केंद्र उभारण्याची पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेची अनेक वर्षांपासून मागणी होती. यासंदर्भात उद्योग मंत्र्यांकडे बैठका झाल्या. त्यानंतर महापालिकेने हालचाली केल्या. अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी मे. एनव्हायरोसेफ कन्सल्टंट यांची नेमणूक केली. त्यानंतर महापालिकेने २२ कोटी ८४ लाख ७५ हजार ५७६ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. पिंपरी, चिंचवड आणि भोसरीतील औद्योगिक विकास महामंडळासाठी (एमआयडीसी) पिंपरी-चिंचवड महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार आहे. हे केंद्र एमआयडीसीने दिलेल्या टाटा मोटर्सच्या मालवाहतूक प्रवेशद्वारासमोरील मोकळ्या भूखंडावर (प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक) औद्योगिक विकास महामंडळासाठी (एमआयडीसी) पिंपरी-चिंचवड महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार आहे.




### चार मजल्यांचे केंद्र

» अग्निशमन केंद्र चार मजल्याचे असणार आहे. तळमजल्यावर पाच अग्निशमन वाहनांसाठी वाहनतळ, नियंत्रण, मीटर खोली, मटेरियल स्टोअर, उद्वाहक (लिफ्ट) जिना, पहिल्या मजल्यावर पुरुष आणि महिला जवानांसाठी आराम खोली, दुसऱ्या मजल्यावर संगणक कक्ष, प्रशिक्षण हॉल, ग्रंथालय, तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर दोन सदनिका असणार आहेत.

> एमआयडीसीने अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी भूखंड महापालिकेच्या ताब्यात दिला आहे. याठिकाणी अत्याधुनिक असे अग्निशमन केंद्र आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उभारण्यात येणार आहेत. या केंद्रामुळे एमआयडीसी आणि परिसरातील रहिवाशी भागात आगीच्या घटना घडल्यास ती विझविण्यासाठी मदत होणार आहे.
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता, महापालिका**

> एमआयडीसीसाठी स्वतंत्र अग्निशमन केंद्र असावे, अशी अनेक वर्षांची मागणी होती. याबाबत उद्योगमंत्र्यांकडे सातत्याने बैठका झाल्या होत्या. या मागणीला आता यश आले आहे. अत्याधुनिक यंत्रणेसह केंद्र उभारावे. केंद्राचे काम लवकरात-लवकर पूर्ण करावे.
>
> **- संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटना**

# बेदरकार पीमपी! दोन महिन्यांत जवळपास 100 हून अधिक अपघातांची नोंद

## पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये दिवसाकाठी 60 हून अधिक अपघात होत असल्याची नोंद आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात सार्वजनिक सेवा पुरवणाऱ्या पीएमपी बसगाड्यांच्या अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामध्ये केवळ पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये दिवसाकाठी 60 हून अधिक अपघात होत असल्याची नोंद आहे. या अपघातात ठेकेदारांकडील गाड्यांचे प्रमाण अधिक आहे. पिंपरी व निगडी या दोन आगारांत अपघाताची नोंद ठळकपणे दिसून येते. अपघातांवर नियंत्रणासाठी चालकांवर दंड, पगार कपात, निलंबन, नोटीस अशा कारवाई करूनही चालकांचे वर्तन सुधारत नसल्याचे दिसून येत आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळ पुणे पिंपरी-चिंचवड तसेच पीएमआरडीए हद्दीमध्ये बससेवा पुरवते. सध्या 2 हजारांहून अधिक बसगाड्या विविध मार्गांवर धावतात. तर, 500 च्या आसपास ई-बसेस सार्वजनिक सेवा पुरवतात. चालकांकडून होणाऱ्या चुका अथवा विरुद्ध दिशेने येणाऱ्या इतर वाहनांमुळे किरकोळ व बऱ्याच वेळा मोठे अपघाताच्या घटना घडतात. अरुंद रस्ते, वाहतूक कोंडी, रस्त्याच्या कडेला असलेले पार्किंग आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन या कारणामुळे अपघात होत असल्याचे वाहनचालक सांगतात: मात्र अनेकदा बसवरील नियंत्रण सुटणे, दुभाजक दृष्टीस न पडणे व गर्दीत चालवण्याच्या अनुभव नसणे, बेदरकारपणे वाहन चालविणे; तसेच ओव्हरटेकच्या नादात बसचे अपघात घडतात.




### ठेकेदारांकडील बसगाड्यांचे अपघात सर्वाधिक

» पुणे महानगर परिवहन महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, भाडे तत्त्वावरील बसेसचे अपघात जास्त प्रमाणात आहेत. पीएमपीच्या मालकीच्या बसगाड्यांच्या अपघाताचे प्रमाण कमी आहे. गेल्या वर्षभरात 12 नागरिकांना गंभीर जखमी केली आहे. तर, 17 नागरिक किरकोळ जखमी झाले आहेत. दरम्यान, पीएमपीच्या बसचालकांना आवश्यक ते प्रशिक्षण देणे गरजेचे असून, गर्दीच्या ठिकाणी प्रशिक्षित चालकास नेमावे, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

शहर परिसरात गेल्या दोन महिन्यांत जवळपास 100 हून अधिक अपघातांची नोंद आहे. मे महिन्यामध्ये 49 विविध ठिकाणी अपघात झाले आहेत. अपघातात केवळ व्यक्ती नव्हे, तर रस्त्यावरील श्वान, भटकी गुरेदेखील जखमी झालेली आहेत. वर्षभरात वेगवेगळ्या मार्गावर 30 नागरिक पीएमपीच्या अपघातामध्ये जखमी झाले आहेत. तर, खासगी ठेका दिलेल्या पीएमपी बसचे अपघात सर्वाधिक असून 48 नागरिक या अपघातामध्ये जखमी झाले आहेत. यात गंभीर, किरकोळ जखमी अपघातदेखील घडले असून त्याची संख्या 53 आहे. दुचाकी, मोटार घासणे, दुभाजकावर बस धडकणे, सिग्नलच्या दरम्यान अचानक पुढील वाहन थांबणे अशी काही अपघातांची कारणे असल्याचे दिसून आले.

# अति पावसाने ग्रामीण जनजीवन विस्कळीत

## मुसळधार पावसामुळे दरड कोसळणे, बांध खचणे, पूर परिस्थिती यामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात सर्वत्र मागील आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असून स्थानिक नागरिकांनी पावसामध्ये बाहेर जाताना स्वतःची काळजी विशेषता आदिवासी भागात डोंगराळ तसेच संवेदनशील भागात मुसळधार पावसामुळे दरड कोसळणे, बांध खचणे, पूर परिस्थिती यामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

आदिवासी भागात आहुपे,पाटण व बोरघर या खोऱ्यात मुसळधार पाऊस पडत असून अनेक ठिकाणी भात खाचरे वाहून गेली. अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच महाळुंगे,गिरवली, आमोंडी, शिनोली व डिंभे या भागातील बाजरी पिके भुईसपाट झाली असून बळीराजाचे मोठे नुकसान झाले आहे. निसर्गाच्या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेला शेतीमाल सडून त्याचबरोबर बाजारभाव नसल्याने शेतकऱ्याचे पदरी निराशा उरली आहे. डिंभे बुद्रुक येथील नवीन पुलाचे काम चालू असल्याने तेथेच बाजूला पर्याय रस्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.

मात्र, रविवारी झालेल्या मुसळधार पावसात हा पर्याय रस्ता वाहून गेल्याने डिंभे बुद्रुक, फुलवडे, बोरघर व आहुपे आदी गावांचा संपर्क तुटला होता. मात्र, प्रशासनाने सुपेधर महाळुंगे येथील रस्त्यावरून तात्पुरती नागरिकांना जाण्यासाठी व्यवस्था केली आहे. भीमाशंकर तसेच आहुपे खोऱ्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस पडत असल्याने गेली २५ वर्ष मे महिन्यात कधीच नदी नाले दुथडी भरून वाहिले नाही. मात्र, या पावसात पूर परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मे महिन्यात चालू झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती त्याचबरोबर शेतीच्या मशागतीला उशीर झाल्याने शेतातील मिळणारे उत्पादन घटले आहे. तसेच यावर्षी मान्सूनचे आगमन लवकर असल्याने बळीराजाला शेती कामासाठी वेळ मिळेल का अशी चिंता भासत आहे.

आदिवासी भागात आहुपे,पाटण व बोरघर या खोऱ्यात मुसळधार पाऊस पडत असून अनेक ठिकाणी भात खाचरे वाहून गेली. अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अस्मानी संकटामुळे आमोंडी येथील शेतकरी बेबीताई फलके यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साठल्याने यांच्या शेतीचे बांध वाहून गेल्याने शेती पिकाचे तसेच शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या शेतीचे शासनाने लवकरात लवकर पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी यांनी केली आहे.

मागील आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असून स्थानिक नागरिकांनी पावसामध्ये बाहेर जाताना स्वतःची काळजी विशेषता आदिवासी भागात डोंगराळ तसेच संवेदनशील भागात मुसळधार पावसामुळे दरड कोसळणे, बांध खचणे, पूर परिस्थिती यामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे.





### शेतात पाणी शिरल्याने मोठे नुकसान

» निसर्गाच्या अवकाळी तसेच अस्मानी संकटामुळे आमोंडी येथील शेतकरी बेबीताई फलके यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साठल्याने यांच्या शेतीचे बांध वाहून गेल्याने शेती पिकाचे तसेच शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या शेतीचे शासनाने लवकरात लवकर पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी बेबीताई फलके यांनी केली आहे.

“ वर्षभर घराची रोजी रोटी चालेल, या पोटी मी शेतामध्ये बाजरीचे पीक घेतले होते. मात्र, निसर्गाच्या अस्मानी संकटाने माझे बाजरीचे पीक पूर्णतः भुईसपाट झाले. सतत चाललेल्या पावसामुळे बाजरीच्या कणसे ओली चिंब झाल्याने माझे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हातात तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने काय करावे रोजी रोटीसाठी पुढे आमचे काय होईल असा प्रश्न भेडसावत आहे.

**- बेबीताई फलके, नुकसानग्रस्त शेतकरी**

# कोरेगाव मूळ येथे उड्डाणपुलाची नागरिकांना प्रतिक्षा

## खासदार अमोल कोल्हे यांना निवेदन देऊन लक्ष घालण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

कोरेगाव मूळ येथील प्रलंबित रेल्वे उड्डाणपूल कधी होणार, याकडे पूर्व हवेलीतील नागरिकांचे लक्ष लागले असून याबाबत खासदार अमोल कोल्हे यांना निवेदन देऊन लक्ष घालण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.

माजी सरपंच विठ्ठल शितोळे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय काकडे, माजी उपसरपंच लोकेश कानकाटे व सामाजिक कार्यकर्ते सचिन कड यांनी माहिती दिली की, कोरेगाव मूळ ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातून राज्यमार्ग क्र. 117 जात असून त्या रस्त्याला पुणे-सोलापूर लोहमार्गावर रेल्वे गेट क्र. 8 वर 2018 साली उड्डाणपूल मंजूर झाला आहे.

पुलाचे कामदेखील सुरु करण्यात आले होते; मात्र काही कारणास्तव पुलाचे काम बंद पडले आहे. त्यामुळे कोरेगावमूळ गावातील व आसपासच्या 25 ते 30 गावांना या रस्त्यावरून रेल्वेगेट मार्गाने वाहतूक करावी लागते. रेल्वे गाड्याची सतत ये जा असल्याने रेल्वे गेट बंद असल्यामुळे बऱ्याच वेळ गेटवर थांबावे लागते. त्यामध्ये शाळा कॉलेजचे विद्यार्थी, शेतकरी वर्ग, नोकरदार, व्यावसायिक व गावाशेजारी प्रयागधाम चॅरिटेबल हॉस्पिटल असल्याने तिथे देशातून व राज्यातून रुग्ण येत आहेत.

रुग्णांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणा-या रुग्णवाहिकेस रेल्वे गेट बंद असल्याने वेळेअभावी बऱ्याचशा रुग्णांना त्रास होत आहे. गावातील स्मशानभूमी मुळा-मुठा नदीच्या कडेला असल्याने रेल्वे मार्गा पलीकडे कुटुंबातील अंत्यविधीच्या कार्यक्रमाच्या वेळी रेल्वे गेटवर बऱ्याच वेळ थांबावे लागत आहे. त्यामुळे काही कुटुंबाकडे स्वमालकीची जागा असल्याने ते अंत्यविधी त्यांच्या स्वतःच्या जागेत करावे लागत आहे.

मात्र ज्या कुटुंबांना जागा नाही, अशा कुटुंबांना गावात आल्याशिवाय पर्याय नाही. तसेच राज्यमार्ग क्र. 117 चे रुंदीकरण व नवीन रस्ता करण्याचे काम देखील जवळजवळ झाले आहे. त्यामुळे वाहतूकचे प्रमाण वाढले असून येथील गेट उघडले की, वाहनचालक वाहने कशीपण पुढे नेत असल्याने सतत वाहतूक कोंडी होत आहे.



### खासदारांनी लक्ष घालावे

» या पुलाचे काम मंजूर असूनदेखील हे काम होत नाही व या विषयांबाबत सरकारकडे पाठपुरावा करून देखील उपयोग झाला नाही. व या भागातील गावांना न्याय मिळाला नाही. काही थोड्याशा लोकांच्या जमिनी या पुलाच्या कामासाठी जात असून त्यांचाच विरोध या पुलाला आहे. पण लाखो नागरिकांच्या दळणवळणाकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. म्हणून खासदार कोल्हे यांनी या विषयात लक्ष देऊन आमचा प्रलंबित प्रश्न सोडवावा. अशी मागणी नागरिकांनी केली आहे.